MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## हनी ट्रॅपमध्ये असा अडकला की भारताची गुपितं पाकिस्तानला दिली

मुंबई: भारतीय नौदलाच्या हेरगिरी प्रकरणात आणखी एका व्यक्तीविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आलं आहे. अमन सलीम शेख आरसी हा या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे, ज्याने भारतीय नौदलाच्या जवानांना हनी ट्रॅप करण्यासाठी पाकिस्तानी एजंट्सशी संगनमत करून संरक्षण आस्थापनांची गुप्त माहिती गोळा केल्याचं एनआयएने आपल्या आरोपपत्रात म्हटलं आहे. एनआयएने मुंबईतील रहिवासी असलेल्या अमन सलीम शेख आरसी या व्यक्तीवर आयपीसी आणि यूएपीए कायद्याच्या अनेक कलमांखाली आरोप केले आहेत. एजन्सीने विशाखापट्टणम येथील विशेष एनआयए न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२३४ शुक्रवार दि.१७ मे २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -234 FRIDAY DT. 17 MAY 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# बीड जिल्हा पोलीस दलातील अनेक पोलीस अधिकारी मुंडके मोडण्यातच व्यस्त?

रुपये जर हरिभाऊ खाडे जवळ मिळतात तर हरिभाऊ खाडीत एकूण संपत्ती किती असेल अंदाज लावा?

मल्टीस्टेट वाल्यांनी हरामची कमाई लुटली त्या कमाईवर पोलिस वाल्यांनी डल्ला मारला

बीड जिल्ह्यात दारू, गुटखा, मटका, वाळूमाफियां, भू माफिया,पोलीस अधिकारी यांच्या सेवेसाठी हजरच असतात?

महत्वाची बीड जिल्हा पोलीस दलातील पद हे राजकीय वरचा लाभलेल्या अधिकाऱ्यांनाच देण्यात येत आहेत?

अनेक बीड जिल्ह्यातील पोलीस अधिकारी वेगवेगळ्या ठाण्याचे प्रभारी यांच्या फोन कॉलची सखोल चौकशी करणे गरजेचे?

या अगोदर बीड जिल्ह्यातील आर्थिक गुन्हे शाखेमध्ये काम केलेले अधिकारी व सध्या बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याचे प्रभारी व बीड जिल्हा पोलीस दलातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी होणे गरजेचे?

ज्ञानराधा साईराम जिजाऊ मल्टीस्टवाल्यांसह

धागेदोरे बीड जिल्हा पोलीस अधिकारी यांच्या सोबत संगमत करून गुन्हे दाखल करण्याच्या अगोदरच संबंधित खाजगी बँका वाल्यांना पोलिसांचे फोन जातात.

पोलिसांच्या संगमने जनतेचा पैसा लुकणारे मल्टीस्टेट वाल्यांना बीड जिल्हा पोलीस दलाकडून संरक्षण?

जिजाऊ मल्टीस्टेट घोटाळ्यात लाच स्वीकारणाऱ्या खाडेकडं कोट्यावधी रुपयांचं घबाड सापडलं

बीडच्या जिजाऊ मल्टीस्टेटच्या घोटाळ्यात एका व्यापाऱ्याला आरोपी न करण्यासाठी १ कोटीच्या लाचेची मागणी करणाऱ्या हरिभाऊ खाडे यांच्या घरावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं धाड टाकत झडती घेतली. या ठिकाणी कोट्यावधी रुपयांचं घबाड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाच्या हाती लागलंय.



आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे च्या घराची झडती : लाचलुचपत प्रतिबंधक

बीड /जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेट वाल्यांनी सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या एक एक रुपया जमा केलेल्या ठेवीदार ह्या अनेक लोकांचे हातावरील पोट असलेल्या ठेवीदारांना अक्षरशः त्यांनी चुरून खाल्ल्याचं काम यावेळी ज्ञानराधा साईराम मल्टीस्टेट जिजाऊ मल्टीस्टेट सह अनेक मल्टीस्टेट वाल्यांनी गोरगरिबांना लोक त्याचा पाप या ठिकाणी करण्यात आलेला आहे बँक वाल्यांना वाचविण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलातील आर्थिक गुन्हे शाखेचे कर्मचारी सह बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशन मधील अधिकारी हे संगमत करून त्या ठिकाणी त्या बँक वाल्यांच्या विरोधात तक्रार पोलीस स्टेशनला गेली तर अगोदर बँक वाल्याला सांगतात की तुझी तक्रार आलेली आहे व नंतर तडजोड करत संबंधित फिर्याद देणाऱ्यास ती फिर्याद मिटवून घेण्यास भाग पाडतात. म्हणून तर बीड जिल्हा पोलीस दलामध्ये काल झालेल्या आर्थिक गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिभाऊ हाडेच्या कारवाई झाल्याने अनेक अधिकारी यांची धांदल उडाली आहे यामध्ये अनेक अधिकारी हे बीड जिल्ह्यातील राजकीय वरद हस्त लाभलेले अधिकारी आहेत यामुळे अनेक गोरगरिबांचा पैसा खाण्यात तर त्यांना परमेश्वर सुद्धा माफ करणार नाही अशी परिस्थिती सध्या निर्माण झालेली आहे.

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील एक बदकाच्या हाती लागले कोटी रुपयांच्या लाच प्रकरणातील आरोपी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांच्या घरावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून झडती घेण्यात आली. या झाडाझडतीदरम्यान पोलीस निरीक्षक खाडेच्या घरातून एक कोटी आठ लाख रुपयांची रोकड त्यासोबतच ९७० ग्रॅम सोनं आणि पाच किलो चांदी जप्त करण्यात आली आहे.

नेमकं काय आहे प्रकरण? : बीड येथील जिजाऊ मल्टीस्टेट मध्ये काही दिवसांपूर्वी घोटाळा झाला होता. या प्रकरणात गुन्हे दाखल झाल्यानंतर हा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडं सोपवण्यात आला. यामध्ये एका व्यापाऱ्याच्या खात्यावर ६० लाख रुपयांची रक्कम वर्ग करण्यात आली होती. त्याच्यासह त्याच्या दुसऱ्या सहकार्यास आरोपी न करण्यासाठी पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे आणि हवालदार जाधव यांनी १ कोटी रुपयांची लाच मागितली होती. तडजोडी अंती तीस लाख रुपये देण्याचं ठरलं होतं. त्यानुसार ५ लाखांचा पहिला हप्ता घेताना एका व्यापाऱ्यास अटक करण्यात आली दोघंही सध्या फरार आहेत

विभागानं न्यायालयाच्या आदेशानुसार हरिभाऊ खाडेच्या बीड मधील चाणक्यपुरी भागातील घराची झडती घेतली. यावेळी रोख १ कोटी ८ लाख रुपये, ९७० ग्रॅम सोन्याची बिस्किटं आणि ७२ लाख रुपये किमतीचे दागिने जप्त करण्यात आले. तर चार लाख ६२ रुपयांची ५.५ किलो चांदी याबरोबरच बारामती येथे फ्लॅट इंदापूर येथे फ्लॅट, इंदापूर येथे व्यापारी गाळा, बारामती आणि परळी येथे प्लॉट अशी स्थावर मालमत्तादेखील आढळून आली. सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला. आता पुढील तपास पोलीस उपाधीक्षक शंकर शिंदे यांच्यासह सहकारी करत आहेत.

# घराची वाटणी मागीतलीस तर तुला जीवे मारू

## अंबाजोगाईतील महिलेची सवतीसह त्यांच्या मुलांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**पतीच्या निधनानंतर मी अंबाजोगाई शहर सोडून आळंदी येथील धोंडोपंत दादासाहेब आतरे यांच्या मंदिरात राहुन उपजिविका भागवत आहे. परंतु माझ्या पतीच्या नावावर असलेली जागेची वाटणी मागीतली असता सवतीसह तिच्या मुलांनी जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्यांच्या विरोधात अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात चौंघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.**

अंबाजोगाई शहरातील जनाबाई मुरलीधर जाधव (वय ४२) व्यवसाय मजूरी रा.विद्याकुंज कॉलनी, प्रशांत नगर, अंबाजोगाई येथील रहिवासी असून पती मुरलीधर जाधव यांचे निधन झाल्यानंतर मी व माझी आई, भाऊ असे आम्ही एकत्र आळंदी येथील धोंडोपंत दादासाहेब आतरे यांच्या मंदिरात राहत आहोत. तेथील मंदिरातील झाड-झोड करून आम्ही आमची उपजिविका भागवतो. माझे पती मुरलीधर जाधव हे पंधरा वर्षापुर्वी मयत झाले असून १६ मे रोजी सकाळी १० वाजता मी माझ्यावडीलांसह बंधुप्रेम कॉलनी प्रशांत नगर भागातील आलो असता माझी सवत कमलबाई मुरलीधर जाधव, शिवाजी मुरलीधर जाधव, बालाजी मुरलीधर जाधव या तिघांकडे माझ्या नावाची वाटणी मागीतली असता त्यांनी मला शिविगाळ करून शिवाजी शेप, रा.शेपवाडी याने पण मला शिविगाळ करून सर्वांनी मिळून मला म्हणाले की, तु जर वाटणी मागीतलीस तर तुझा काटा काढून टाकू अशी जिवे मारण्याची धमकी मला दिली. वरील चौंघांनी जिवे मारण्याची धमकी दिली आहे. अशा प्रकारची फिर्याद शहर पोलिस ठाण्यात दाखल झाली .




### आळंदी येथील मंदिरात सेवा करून भागविते उपजिविका

माझे पती मुरलीधर जाधव यांचे १५ वर्षापुर्वी निधन झाल्यानंतर मी माझ्या मुलीसह आळंदी येथील एका मठामध्ये वास्तव्यास गेले. तेथील मठाधिपतींना माझी परस्थिती सांगीतल्यानंतर त्यांनी साफ सफाईचे काम मला दिले. या कामातून मिळणार्या तुटपूंज्या पैशातून माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह भागविला. या मोल मजुरीतूनच मिळालेल्या पैशातूनच मुलीचा विवाह देखील करून दिला. परंतु माझ्या नवर्याच्या नावाने अंबाजोगाई येथील असलेल्या जागेतील वाटणी मागीतली असता त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे मी कायदेशिर बाजूने न्याय मागीतला आहे. कायद्यातून न्याय मिळाला नाही तर माझ्या कुटूंबासह बेमुदत आंदोलन करणार असल्याचे तक्रारदार जनाबाई जाधव यांनी सांगितले.

### दोन दिवसांच्या शिळ्या भाकर्या घेवून पिडीत महिलेने पोलिसांकडे मागीतला न्याय

दोन दिवसांपुर्वी आळंदी येथून आलेल्या महिलेने मठात मिळालेल्या भाकरी घेवून अंबाजोगाईचे शहर पोलिस ठाणे गाठले या भाकरीवर तीने दोन दिवस काढले. पोलिसांनी या महिलेची हाकीकत जाणल्यानंतर लागलीच सदरील आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला परंतु पोलिस या महिलेला न्याय देतील का? हे पहावे लागेल. पोलिस ठाण्याचे एफआयआर प्रत घेवून मिडीयाकडे आली असता त्यांनी दोन दिवसांचे शिळे तुकडे दाखविल्यामुळे या घटनेचे गांभीर्य मिडीयाला लक्षात आले या प्रकरणात पोलिस कितपत न्याय देतात हे पहावे लागेल.



# गेवराई तालुक्यात पाण्याअभावी फळबागा मोजतात शेवटची घटका

## शेतकरी हवालदिल

गेवराई (प्रतिनिधी)

तालुक्यातील जमिनी मध्यम स्वरूपाच्या आहेत त्यामूळे येथील शेतकरी नेहमीच आस्मानी सुलतानी संकटानी भरडलेला असतो, शेतीवर केलेला खर्च सुद्धा पदरात पडत नाही एवढी शेतीची अवस्था बिकट होत चालली आहे निसर्गाची अवकृपा यंदा गेवराई तालुक्यात फेब्रुवारी महीन्यातच विहीर, बोअर, तलाव कोरडे ठाक पडले आहेत त्याम ळे दुष्काळाची झळ' फळबागेला बसली आहे तळ हाताच्या फोडा प्रमाणे जपलेल्या फळबागेची अवस्था हाताश पणे पाहण्याची वेळ फळबाग उत्पादकावर आली आहे. गेल्या काही वर्षापासून तालुक्यात

फळबागाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असताना पाच सहा वर्षापासून निसर्गाचा समतोल बिघडल्यामुळे वेळी अवेळी येणारे पर्जन्यमान, व पावसाळ्याचे पर्जन्यमान कमी झाल्यामुळे शासनाचे शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतीमालाला हमीभाव नाही यामूळे शेतकऱ्यांनी आधुनिक पध्दतीची कास धरली व गेल्या पाच सात वर्षापासून ज्या शेतकऱ्याकडे पाण्याची सोय आहे असे शेतकरी फळबागेकडे वळले मोसंबी लिंबू, पेरू, आंबा, शेवगा, आदीची लागवड केली परंतू यंदा कमी पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी स्थितीचा फटका फळबागाना बसला आहे

फळबागा जगवण्यासाठी पाणी शोधताना मेटाकुटीला आलेला उत्पादक शेतकरी फळबागा जगवायच्या कशा हा प्रश्न फळबागायतदारांना पडला आहे त्यामूळे करपूण जात असलेल्या फळबागा हाताश पणे, उदास पणे पाहण्याशिवाय कोणताच पर्याय शिल्लक राहिला नाही 'विहीरीतच नाही तर पोवऱ्यात कुठून येणार अशी अवस्था फळबाग शेतकरी उत्पादकाची झाली आहे. जानेवारी पासूनच पाण्याची पातळी खालावली टैंकर, ठीबकच्या माध्यमातून फळबागाच्या झाडाच्या बुडाशी पाला पाचोळा गव्हाच्या भुस्कट थंडावा राहावा म्हणून मार्च पर्यत जगविण्याचा प्रयत्न केला त्यामुळे

या बागा तग धरून होत्या परंतू सध्या उन्हाचे चटके बसून वाढलेल्या तापमानामुळे झाडे कोमजून बाळत आहेत गेल्या पाच सहा वर्षापासून पोटच्या लेकराप्रम ाणे सांभाळलेल्या बागा आज करपून जाताना हाताश पणे पाहण्याची वेळ शेतकऱ्यावर येऊन ठेपली आहे. आणखी दोन महीने पावसाळा असून या फळबागाचे वाळवंट होणार यात शंका नाही. लहान लेकराप्रमाणे सांभाळलेल्या मोसंबी सफरचंद चिकू मोहगुनी आधी बागा मात्र सध्या एक प्रकारे जळून खाक होण्याच्या मार्गावर असल्याने शेतकऱ्याचा जीव कासावीस होत आहे.




## आज सकाळी सहा वाजल्यापासून मोमीन पुरा कुरेशी मोहल्ला या ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडित होता

कडक अश्या उन्हामुळे उकाड्याने नागरिक त्रस्त झाली होती

या बाबत सदरील माहिती वाजेद जावेद कुरेशी यांना मिळताच त्यांनी तात्काळ विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना याची कल्पना देत त्यांनी ही तत्काळ प्रतिसाद देत कामास सुरवात केली आणि आता दुपारी ४ वाजता हा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला यावेळी परिसरातील नागरिकांची देखील मोठ्या प्रमाणात उपस्तीथी होती,आदरणीय जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली समाजसेवेचे हे कार्य असेच सुरू राहणार आहे जनतेसाठी सदैव तत्पर वाजेद जावेद कुरेशी

# ४ महिन्यात २६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**मराठवाड्यात शेतकऱ्यांची ससेहोलपट सुरुच आहे. महाराष्ट्रातील एकट्या मराठवाडा विभागात आठ जिल्ह्यातील २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आलं आहे. त्यामुळे राज्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरु असतानाच दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांची भीषण अवस्था समोर आली आहे. मराठवाडा विभागात सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यात झाल्या आहेत.**



### गेल्या चार महिन्यात झालेल्या आत्महत्या

जालना २९ परभणी १२ हिंगोली १३ नांदेड ४१ बीड ५९ लातूर २७ धाराशिव ४२ एकूण २६७ २०२३ मध्येही १,०८८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या चार महिन्यांत २६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असतानाच २०२३ मध्ये मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये तब्बल १,०८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अहवालातून समोर आले होते. २०२२ च्या तुलनेत हा आकडा ६५ ने वाढला होता.

मराठवाड्यात गेल्या चार महिन्यात २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आहेत. बीडमध्ये ५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यानंतर छत्रपती संभाजी नगरचा नंबर असून ४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे निसर्गाच्या दृष्टचक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांची वाताहत सुरु असल्याचे चित्र आहे.

२०२३ मध्ये झालेल्या १,०८८ आत्महत्यांपैकी बीडमध्येच सर्वाधिक २६९ आत्महत्या झाल्या होत्या. छत्रपती संभाजीनगरमध्ये १८२, नांदेडमध्ये १७५, धाराशिवमध्ये १७१ आणि परभणीमध्ये १०३ आत्महत्या झाल्या, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. जालना, लातूर आणि हिंगोली येथे अनुक्रमे ७४, ७२ आणि ४२ मृत्यूची नोंद झाली आहे. मराठवाड्यात २०२२ मध्ये सुद्धा १,०२३ शेतकरी आत्महत्या झाल्या. ज्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, धाराशिव, लातूर, नांदेड आणि परभणी जिल्ह्यांचा समावेश आहे.

# नांदूरमध्ये दोन समाजामध्ये तुफान दगडफेक




बीड : लोकसभा निवडणुकीचे मतदान १३मे ला संपल्यानंतर आता सोशल मीडियावर कोण विजयी होणार याच्या चर्चा रंगल्या असताना नांदूरमध्ये जातीय तणावाची परिस्थिती एका आक्षेपहार्य पोस्टमुळे निर्माण झाली आहे. दोन समाजातील गट समोरसमोर आल्यानंतर दगडफेकीच्या घटना घडल्या असून केज पोलीस घटनास्थळी पोहचले आहेत.

सोशल मीडियावर सध्या निवडणूक संपल्यामुळे वातावरण तापलेले आहे. विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याच्या चर्चा चांगल्याच रंगल्या असताना काही जण ही निवडणूक जातीय समीकरणावर घेऊन आल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे.मनोज जरांगे याच्या पोस्टवर प्रतिक्रिया दिल्यानंतर याला वेगळे रुप प्राप्त झाले. त्यामुळे गावात वाद होऊन दोन गट समोरासमोर आल्याने घरावर दगडफेकीच्या घटना घडल्या आहेत. यामुळे नांदूरमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली असून घटनास्थळी केज पोलीस दाखल झाल्याची माहिती आहे.अद्याप हा प्रकार कशामुळे घडला हे समोर आलेले नसून पोलीस गावात आल्याने परिस्थिती नियंत्रणात आली आहे.

# बीडमधील सुमीत वाघमारे खून प्रकरण

## खूनप्रकरणात भावाला वाचवण्यासाठी बहीण फितूर; ओढणीवरील रक्ताने दोघांना जन्मठेप

बीड - बहिणीने केलेल्या प्रेमविवाहामुळे भावाने मित्राच्यामदतीने तिच्या पतीचा भररस्त्यात खून केल्याची घटनाबीड शहरात १९ डिसेंबर २०१८ रोजीघडली होती. सुमीत शिवाजीवाघमारे (रा. तालखेड, ता.माजलगाव) असे खून झालेल्यातरुणाचे नाव होते. या खटल्यातसुमीतची पत्नी भाग्यश्री हिनेच साक्षफिरवून आरोपी भावालावाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र,घटनेवेळी तिच्या ओढणीवर,सँडलवर आणि चाकूवरील रक्त हे डीएनए तपासणीतसुमीतचे असल्याचे सिद्ध झाले. या प्रकरणात बालाजीलांडगे व संकेत वाघ यांना जन्मठेप सुनावली गेली, तरकृष्णा क्षीरसागर व गजानन क्षीरसागर यांची निर्दोषमुक्तता झाली.

सुमीत शिवाजी वाघमारे (रा. तालखेड) व भाग्यश्रीशेषकुमार लांडगे (रा. बीड) हे बीड येथील आदित्यअभियांत्रिकी महविद्यालयात शिक्षण घेत होते.प्रेमप्रकरणातून भाग्यश्रीने पळून जाऊन २५ ऑक्टोबर२०१८ रोजी सुमीतशी विवाह केला. १९ डिसेंबर २०१८रोजी सुमीत व भाग्यश्री अभियांत्रिकीचा शेवटचा पेपरदेऊन दुचाकीवरुन जाताना महाविद्यालयासमोरबालाजी लांडगे व संकेत वाघ यांनी सुमीतवर वारकरुन त्याचा खून केला होता.

शिक्षेतून वाचण्यासाठी सरकारी वकिलाविरोधातही तक्रारी

साक्ष फिरवूनही भाऊ वाचत नसल्याने व वकील मिलिंद वाघीरकर प्रभावी युक्तिवाद करत असल्यानेतिने त्यांच्या विरोधात विधी न्याय विभागाकडे तक्रार केली. दरम्यानच्या काळात वाघीरकर यांचीसरकारी वकील म्हणून नियुक्ती संपली. मात्र सुमीतच्या वडिलांनी मंत्रालयातून विशेष वकील म्हणूनत्यांची नियुक्ती मिळवली. त्यालाही उच्च न्यायालयात तिने आव्हान दिले.



मात्र तिचा अर्ज फेटाळला.

भाग्यश्री ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होती. ती २१महिने सासरी राहिली. ६ मार्च २०२० रोजी तिचीसाक्ष नोंदवली. यात तिने बालाजी व संकेतनेचखून केल्याचे सांगितले. ३० सप्टेंबर २०२० रोजीलातूरला आजीकडे जाते म्हणून गेली. ऑगस्ट२०२१ मध्ये सुनावणीसाठी आली, या वेळी तिनेघटनास्थळ हजर नसल्याचे सांगितले होते.

### ३ मिनिटांत ६ वार, तरी रस्त्यापर्यंत धावला

बालाजी याने सुमीतच्या छातीवर, पोटावर सपासप ६खोलवर वार केले होते.संकेतने त्याला धरले होते. अवघ्या ३मिनिटांत त्याने सुमीतला संपवले . वार होऊनही जखमीसुमीत मदतीसाठी मुख्य डांबरी रस्त्यापर्यंत पळत आला आणितिथे कोसळला. खून करुन परराज्यात पळून जाताना बडनेरारेल्वे स्थानकातून बालाजी व संकेत याला अटक केली होती.

### ३५ जणांची नोंदवली गेली साक्ष

सरकारी पक्षाने ३५ जणांची साक्ष नोंदवली. तपासअधिकारी, पंच, डॉक्टर यांची साक्ष महत्त्वाचीठरली. बालाजीच्या शर्टवरील रक्त, कारच्यासीटवरील रक्त, चाकूवरील रक्त, भाग्यश्रीच्याओढणी व सँडलवरील रक्त हे सुमीतचेचअसल्याचे डीएनए चाचणी करुन सिद्ध झाले.त्यामुळे तक्रारदार पत्नी भाग्यश्रीनेच साक्ष फिरवनूहीबालाजी व संकेत यांना शिक्षा झाली.

# परळीच्या हालगे कॉलेजचे परीक्षा केंद्र तीन वर्षे बडतर्फ

## डिसेंबरमध्ये पेपर लीक, पाच महिन्यांनी कारवाई

बीड - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभियांत्रिकी पेपर फुटीप्रकरणी, परळीच्यानागनाथअप्पा हालगे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र रद्द केले होते. आता या कॉलेजचे परीक्षा केंद्र३ वर्षांसाठी बडतर्फ केले आहे.शिवाय प्राचार्यांसह येथील स्टाफला परीक्षा कामासाठी तीन वर्षांपर्यंत बंदी घातली आहे.

विद्यापीठाच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा १२ डिसेंबरपासून सुरु झाल्या होत्या. या परीक्षेत पाचव्या दिवशी दुपारच्यासत्रात बी.ई सिव्हील अंतिम वर्षाचा डिझाइन ऑफ स्ट्रक्चर (थ्री) हा पेपर दोन वाजता सुरू होणे अपेक्षित होता. पण पेपर सुरू होण्यापूर्वी माध्यमावरलिक झाल्याची तक्रार प्राप्त झालीहोती. त्यानंतर तत्कालीन कुलगुरूडॉ. प्रमोद येवले यांनी तत्काळ दखलघेऊन परीक्षा विभागाला चौकशीचेआदेश दिले होते.



संबधितप्रश्नपत्रिका हालगे अभियांत्रिकीमहाविद्यालयाच्या केंद्रावरुन १ वाजून८ मिनिटे व २२ सेकंदांनी डाऊनलोडकरण्यात आली. त्यानंतर १ वाजून ११मिनिटांनी पेपर लिक झाला . प्राचार्यडॉ. एम. भास्करराव व परीक्षाप्रमुखडॉ. ए. बी. चाटे यांच्या विरोधात,परीक्षा संचालक डॉ. भारती गवळीयांनी फिर्याद दिली होती. पण डॉ.येवले निवृत्त झाल्यानंतर विद्यापीठस्तरावरून काहीच कारवाई केलीगेली नव्हती. आता कारवाई झाली.

सह-केंद्रप्रमुखही अडकले


डिसेंबर दरम्यान मावळते कुलगुरूडॉ. येवले यांच्या काळात हा प्रकारघडला होता. त्यानंतर आता पाचमहिन्यांनी कुलगुरू डॉ. विजयफुलारी यांनी कारवाईचा बडगाउगारला आहे. १५ एप्रिलच्या परीक्षा वमुल्यमापन मंडळाच्या बैठकीत हालगेकॉलेजचे केंद्र तीन वर्षांसाठी बडतर्फकरण्याचा निर्णय झाला होता. पणपत्र काढायला डॉ. फुलारी यांनी पुन्हाएक महिना घेतला. परळीच्याजवाहरलाल नेहरू कॉलेजचे प्रा. डॉ.दशरथ रोडे यांना तीन वर्षांसाठीपरीक्षेच्या कामापासून दूर ठेवलेजाईल. त्यांच्याकडे सहकेंद्रप्रमुखम्हणून जबाबदारी होती.

## तुमची गुंडगिरी किती दिवस सहन करायची ?

# आमच्याकडेही खुंखार लोक- जरांगे:मुंडे बहीण-भावाला इशारा, फडणवीसांवरही टीकास्त्र

बीड - तुमची गुंडगिरी किती दिवस सहन करायची? आमच्याकडेही खुंखार लोक आहेत, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी पंकजा मुंडे, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना दिला. मला बीडमध्ये न येऊ देण्याची भाषा करत असाल तर तुमच्या नेत्यांनाही महाराष्ट्रात फिरायचंय हे लक्षात ठेवा, असेही ते म्हणाले. देवेंद्र फडणवीसांवरही त्यांनी टीकास्त्र सोडले.

सोशल मीडियावरील एका पोस्टवरून बीडच्या नांदूरघाट गावात रात्री दगडफेक झाली. त्यात जखमींची जरांगे यांनी गुरुवारी बीड जिल्हा रुग्णालयात भेट घेतली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले की, मराठा आरक्षण उपोषणाला नावं ठेवली. विरोध केला. तुमच्या मंचावर मराठा समाजातील नेत्यांना बसायला जागा नव्हती, पण मी एकदाही म्हणालो नाही की, पंकजाताईला किंवा मविआचा तुमची गुंडगिरी किती दिवस सहन करायची...उमेदवार पाडा, पण आम्हाला हे माहिती आहे की वेळ निघून गेले की असं होणारच. मी बलिदान देण्यास तयार आहे. मला बीडमध्ये येऊ देणार नाहीत,



असं म्हणत आहेत. मराठा समाजाचे असे उपकार फेडता का? मराठा समाज इतका लेचापेचा नाही, तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात आणि मुंबई, पुणे, संभाजीनगरला फिरायचं आहे. मराठ्यांची मतं लागतात. मराठ्यांचे नेते प्रचाराला लागतात. मराठ्यांच्या मतांवर मोठे होता येते. तरीही प्रत्येक वर्षी अन्याय सुरू आहे. संकट अंगावर आले की पाया पडतात आणि संकट निघून गेलं की लगेच बदलतात. आष्टी, पाटोद्यात काय झालं, बीडमध्ये काय झालं, माजलगाव आणि परळीमध्ये काय झालं संपूर्ण महाराष्ट्र बघत आहे.मराठा जीव द्यायला तयार : मराठ्यांच्या जिवावर मोठे घेऊन मराठ्यांचा जीव घ्यायचा असेल तर मराठा जीव द्यायला तयार आहे. दोघा बहीण-भावांचा विषय आहे. शेवटी मराठा मतं घेऊन मोठं व्हायचं, कोणत्याही पक्षात राहायचं आणि मोठं व्हायचं. हा खरा मराठा अपमान नेत्यांचा आहे. जात संपली तर नेत्यांना काय किंमत राहणार, असा सवालही जरांगेंनी केला.फडणवीसांवरही निशाणा : फडणवीसांवर टीका करत जरांगे असेही म्हणाले की, माझं रक्षण मराठा समाज करत आहे. मला कोणाची गरज नाही. बघू किती दिवस सहन होत आहे. ते पोलिस अधीक्षक कशामुळे गुन्हे दाखल करून घेत नाहीत? लेकरांची तडफड होते, गृहमंत्री साहेबांचे राज्य आहे का? अन्याय सुरू आहे. जात संपली की तुम्हीही संपलात, मराठ्यांच्या नेत्यांनो सावधान, आम्ही शांत पद्धतीने बघणार आहोत. बहीण-भाऊ किती दिवस हल्ले करून येतात हे पाहणार आहोत. जोपर्यंत सहन होत आहे तोपर्यंत सहन करू, पण मराठा समाजात खूप मोठी खदखद निर्माण झाली आहे.

# लोकनेत्या पंकजाताईंना विजयी करण्यासाठी अहोरात्र धडपडणारा युवा चेहरा - संदीप तांदळे

पाटोदा : नितिन भोंडवे

नुकतेच १३ तारखेला पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अंतिम निर्णयाची सर्वांना चाहूल लागली आहे. विजयाचा गुलाल उधळवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ते उत्सुकतेने वाट बघत आहेत. आपला नेता निवडून आणण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी विजयाची धुरा हातात घेऊन काम करून मतदानास भर पाडण्याचे काम केले आहे

त्यामध्ये लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्यासाठी ना . धनंजय मुंडे व वाल्मीक अण्णा कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र धडपडणारा युवक,ग्राउंड चा युवा चेहरा संदीप भैया तांदळे यांनी मोलाचा वाटा उचलला आहे.



निवडणुकीच्या अगोदर गेले अनेक दिवस संदीप भैया तांदळे यांनी पाटोदा तालुक्या सह जिल्हा पिंजून काढत त्यांच्या विजयाची धुरा हातात घेतली होती. खरं पाहिलं तर युवा चेहऱ्यामधून संदीप भैया तांदळे यांनी खूप युवक एकवटून ही निवडणूक पार पाडली आहे. लोकनेते पंकजाताई मुंडे यांच्यावरच गुलाल पडणार असल्याची चर्चा युवकांमध्ये होत आहे.

एका सामान्य कुटुंबातून संदीप तांदळे यांचा जीवन प्रवास आहे.गावोगावी समाजसेवा करणे, लोकांचे प्रश्न सोडवणे, अडचणीच्या वेळी धावून जाणे ह्याच त्यांच्या स्वभावामुळे त्यांची पाटोदा तालुक्या सह जिल्हा भर युवा क्रेझ असून त्यांच्या नावाची सर्वत्र चर्चा होत आहे.

## शेतकऱ्याच्या पोराची गरुडभरारी

# बीडमधील जिवाचीवाडीच्या भाऊराव शिवाजी कुटे यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत टेक्निकल असिस्टंटपदी निवड

बीड (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील जिवाचीवाडी गावातून भाऊराव शिवाजी कुटे यांनी मुंबई येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजे इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन इस्रोच्या यु आर राव सॅटेलाइट सेंटर मध्ये भरारी घेतली आहे. भाऊराव कुटे हा गरीब घराण्यातील शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे.विशेष म्हणजे भाऊराव कुटे यांचे आईवडील हे ऊसतोड कामगार करत आहेत तसं तर आपण पाहिलं तर बीड जिल्हा ऊसतोड कामगाराचा जिल्हा म्हणून आख्या महाराष्ट्राला परिचित आहे .

अतिशय डोंगराळ भागात असणार जिवाचीवडी हे गाव आणि त्यांनी अशा डोंगर



भागामध्ये शिक्षण घेऊन एवढ्या मोठ्या पदापर्यंत जायचं आई-वडिलांच स्वप्न त्यांनी त्याच्या स्वतःच्या जिद्द आणि चिकाटीवर पूर्ण केलअसून,

पूर्ण गावभर त्याचं कौतुक होत आहे.केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील शिवाजी कुटे या ऊसतोड कामगाराचा मुलगा भाऊरावने २०२२ मध्ये इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन टेक्निकल असिस्टंट या पदासाठी परीक्षा दिली होती. भाऊराव शिवाजी कुटे यांची मुंबई येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) या ठिकाणी १५ मे २०२४ पासून नियुक्ती झाली आहे.

# सायली वीर ने ९५% गुण घेऊन सी.बी.एस.ई.दहावी बोर्डात प्रथम

बीड (प्रतिनिधी)

सी.बी.एस.ई दहावी बोर्डाचा निकाल दि.१३ मे २०२४ वार सोमवार रोजी दुपारी घोषित झाला.यामध्ये ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल,बीड चा शंभर (१००%) टक्के निकाल लागला आहे.सी.बी.एस. ई.दहावी बोर्ड परीक्षेत सायली सदानंद वीर ९५% घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक मिळवला.कोणतेही कोचिंग क्लास किंवा इतर शिकवणी न लावता केवळ अभ्यास करून यश प्राप्त केले.श्री.संत ज्ञानेश्वर इंग्लिश पब्लिक स्कूलच्या शिक्षक वर्गाचे व सायली च्या आई,वडिलाचे मार्गदर्शन मोलाचे ठरले असून सायलीच्या अभ्यास करण्याच्या पद्धत व परिश्रम,शिक्षणाची आवड



मोलाचे ठरले आहे.तसेच हर्षल लक्ष्मण कोलगुडे ९४.४%, तनिष विशाल धांडे ९३.२%, चैतन्य अंकुश घोलप ८७.८%, नीदा ग फार शेख ८७.६%, टक्के मार्क मिळवले आहे. ९ ०% च्या वरती ०३ तर ८०% टक्के च्या वरती १४, ७०% टक्के च्या वर १२,६०% टक्के ची कायम ठेवली आहे. संस्थेच्या संचालकांनी वेळोवेळी मार्गदर्शनामुळेच हे सर्व शक्य झालं आहे.या शाळेची परंपरा कायम राखन्यात यश मिळाले आहे. १० वी बोर्डमधील सर्व विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले.सायली वीर ला मिळालेल्या जिद्द व यशाबद्दल शिक्षकवर्गतून,आईवडील,नातेवाईक सर्वच स्तरातून,माध्यमातून सत्कार करून पेढे भरवण्यात आले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



आर पी आय युवक गेवराई तालुका उपाध्यक्ष जितेंद्र खरात यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना संत रोहिदास प्रतिष्ठान अध्यक्ष तुळशीराम वाघमारे, पत्रकार सुमेध करडे, शिवसेना सर्कल प्रमुख रफीक भाई शेख, पत्रकार विष्णु राठोड, एमआयएम सर्कल प्रमुख कालू कुरेशी महेश खंडेभराडे व आदी

# रोहित्र बसविण्यात विलंब, महावितरण विभागांचे दुर्लक्ष

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील गेवराई शहरातील ताकडगाव रोड येथे गेल्या एक महिन्यापासून रोहित्र बसविण्याचे पोल उभेकरून लोकांना वेडयात काढणायचे काम संबधित महावितरण विभागचे अधिकारी आणि गुतेदार करत आहे, सदरील भागातल्या लोकांना कमी दाबाने विज पुरवठा होत होता असल्यामुळे लोकांनी आमदार लक्ष्मण अण्णा पवार यांना विनंती करून सदरील रोहित्र बसविण्याचे काम करण्यासाठी महावितरण कळविले परंतु सदरील महावितरण विभागाचे अधिकारी आणि गुत्तेदार लोकांना जाणीवपूर्वक त्रास देतात की काय अशी चर्चा आहे. विशेष करुन अधिकाऱ्याच्या दुर्लक्ष मुळे जनतेचे हाल होत आहेत या कडे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देणार का? अशी चर्चा जोर धरू लागली आहे.तसेच तात्काळ रोहित्र



बसविण्यात यावे अशी मागणी जनसामान्यातून व नागरिकांतून होत आहे.

## आदर्श माता पुरस्कार विजेत्या

# स्वर्गीय दौप्रदाबाई दगडोबा दिवटे

## प्रथम वर्ष श्रद्धा निमित्त प्रसिद्ध कीर्तनकार ह, भ, प, बाळू महाराज उखळीकर यांचे कीर्तन संपन्न

बीड (प्रतिनिधी)

आदर्श माता पुरस्कार विजेत्या स्वर्गीय द्रौपदाबाई दगडोबा दिवटे यांच्या प्रथम वर्षश्राद्ध निमित्ताने प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प बाळू महाराज उखळीकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम खरात आडगाव येथे संपन्न झाला या सोहळ्याला प्रसिद्ध मृदुंग वादक श्री.दौलत महाराज वगरे ,गायक श्री.गणेश महाराज पांचाळ, गायक सिंदे महाराज,श्री.किशोर शेजुळ,तर या सोहळ्याला विशेष उपस्थिती लावली ते आमचे मार्गदर्शक श्री.रखमाजी कंबळे,श्री बबन पांचाळ व गावातील टाळकरी भजनी मंडळ, या कार्यक्रमाला



नातेवाईक पाहुणे मंडळी,गावातील पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे मुख्य संयोजन बाबासाहेब दगडोबा दिवटे,यमुनाबाई खामकर,नातू राजेश दिवटे,आकाश दिवटे ,श्रीराम दिवटे, महादेव खामकर यांनी केले

# युवा मल्हार सेना महाराष्ट्र च्या सरसेनापती पदी गणेश कोळेकर पाटील यांची निवड

## युवा मल्हार सेनेचे कार्य राज्यभरात पोहोचवणार, गणेश कोळेकर

बीड (प्रतिनिधी)

युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष इंजीनियर विष्णू देवकते यांच्या आदेशाने युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य सरसेनापती पदी गणेश कोळेकर पाटील यांची निवड करण्यात आली युवा मल्हार सेनेचे संस्थापक अध्यक्ष दादा देवकते व संस्थापक सचिव एडवोकेट राजू शिंदे यांच्या हस्ते यांना स्वाक्षरीत नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली श्री कोळेकर पाटील यांच्या निवडीचे महाराष्ट्र राज्यातून युवा मल्हार सेनेच्या पदाधिकारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले, यावेळी गणेश कोळेकर पाटील म्हणाले आहेत की युवा मल्हार सेनेचे कार्य राज्यभर ग्रामीण भागामध्ये पोहचवनार.





# जमीन जास्त गेली म्हणत ठिबकची नासधूस

माजलगाव -येथील मनूर शिवारात असलेली जमीन ही शेजाऱ्याकडे मोजणीत जास्त गेली आहे म्हणत शेतकऱ्याला आणि त्याच्या पत्नीला मारहाण करत शेतातील ठिबक आणि उसाच्या काकऱ्याचे नुकसान केल्यावरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तालुक्यातील मनूर शिवारात दशरथ सखाराम धारक यांची जमीन असून त्यांच्या शेजारी असलेले बाबासाहेब कांदे यांची जमीन असून धारक यांच्याकडे माझी जमीन जास्त अली असून धारक याना आणि शेतात काम करत असलेल्या त्यांच्या पत्नीला शिवीगाळ करून शेतातील तीन काकऱ्या उसाचे नुकसान अरुण पवार याने त्याच्या ट्रॅक्टर ने करत शेतातील ठिबक चे नुकसान करत जीवे मारण्याची धमकी दिल्यावरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तिघांजनाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे

## समाजाला योग्य दिशादर्शन करणे ही

# साहित्यिकांची जबाबदारी - डॉ.सर्जेराव जिगे

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

अनादीकाळापासून समाजात जी स्थित्यंतरे झाली त्यामध्ये साहित्याचा वाटा मोठा असून ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्र आणि हल्लीच्या ऑनलाईन माध्यमांमधून केल्या जाणार्या लिखाणात समाजामध्ये जागरूकता निर्माण करण्याची ताकद आहे. म्हणून समाजाला बिघडवण्यापेक्षा घडवण्याची जबाबदारी आपसूकच कवी लेखकांवर येऊन पडते असे प्रतिपादन एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा मातृदिन काव्य सप्ताहानिमित्त आयोजित १४ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनात अध्यक्ष पदावरून बोलतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर च्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सर्जेराव जिगे यांनी केले.

पुणे येथील सुप्रसिद्ध साहित्यिक विजय शेंडगे यांची एकता कोअर कमिटीने संमेलनाचे उद्घाटक म्हणून निवड केली होती तर एकताचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, मार्गदर्शक प्रा.डॉ.भास्कर बडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अनंता सूर (यवतमाळ), अनिता यलमटे (लातूर), प्रा.अरविंद हंगरगेकर (धाराशीव), बालाप्रसाद चव्हाण (माजलगाव), प्रमोद घोरपडे (आहिल्यानगर), अनंत गोलाईत (मानवत), गोपाल इंगळे (संभाजीनगर) या निमंत्रित मान्यवरांनी या काव्य संमेलनात सहभाग घेतला. या संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन ईश्वरचंद्र हलगरे (पालघर) यांनी केले.

मातृदिनानिमित्त दि.१२ मे पासून एकता फाउंडेशन मार्फत आई या विषयाचा धागा पकडून राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलन सुरू असून दि.१८ रोजी या काव्य सप्ताहाचा शेवट होणार असल्याची माहिती फाउंडेशन चे प्रदेश संघटक देवीदास शिंदे आणि प्रदेश निमंत्रक इम्रान शेख यांनी प्रसार माध्यमांना दिली. या संमेलनात राज्यभरातील कवी कवयित्री आणि एकताचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

# राऊतमारे कुटुंबावर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

## माजलगाव सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने प्रशासनास निवेदन



माजलगाव ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपरगव्हाण येथील अशोक राऊतमारे या ब्राह्मण कुटुंबाच्या घरावर दगडफेक करण्यात आली तसेच आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे कुटुंबाचे विरोधात घोषणा देत घरासमोरील वाहनांची तोडफोड करीत कुटुंबातील सर्वांना मारहाण करण्यात आली यासाठी घटनेचा सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात येत आहे तसेच या प्रकरणातील हल्लेखोर गावगुंडांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी या संदर्भात जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

बीड येथील ब्राह्मण कुटुंब आपल्या मतदानाचा हक्क कुर्ला गावी बजावून आले त्यानंतर गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत घरावर तुफान दगडफेक केली तसेच घरातील सर्व व्यक्तींना मारहाण करण्यात आली एवढ्यावरच न थांबता घरासमोरील वाहनांची तोडफोड करण्यात आली या घटनेचा माजलगाव ब्राह्मण समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला तसेच सदरील गावगुंडांना अटक करण्यात यावी व योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निवेदन माननीय तहसीलदार व उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले याप्रसंगी ब्राह्मण समाजाचे चंद्रकांत देशमुख, वैभव जोशी, दत्ता महाजन, प्रशांत पाटील, राजेश देशमुख, किरण करंजकर,अनिकेत भिलेगावकर, गणेश कुलकर्णी, पराग खोडसकर, स्वानंद नाईक, भालचंद्र पाठक अमोल जोशी व इतर समाज बांधव उपस्थित होते.

# श्री.अशोक कातखडे सामाजिक कार्यकर्ते यांनी दाखल केलेल्या तक्रारीची मा.लोकायुक्त मुंबई यांनी घेतली गंभीर दखल

**मा.माधव काळे गौण खनिज खनिकर्म अधिकारी बीड या पदाचा त्वरित पदभार काढण्याचे मा.विभागीय आयुक्त छ.संभाजीनगर यांनी दिले आदेश बीड जिल्ह्यात खळबळ.**

**महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी असणारे जिल्हाधिकारी कार्यालय हे अतिशय महत्त्वाचे आणि जबाबदारीचे कार्यालय हे अतिशय महत्त्वाचे आणि जबाबदारीचे कार्यालय समजले जाते.जिल्हाधिकारी कार्यालयातूनच मोठ्या प्रमाणात जिल्ह्याच्या नियोजनाचे आयोजनाचे व पूर्ण विभागाचे नियंत्रण कक्ष असतात. व ते थीलच अधिकारी हे या जिल्ह्याचा कारभार पाहणारे असतात. यांच्या कारभारावर शासनाचे लक्ष असतं आणि इतरत्र कार्यालय व जनतेच्या दुवा म्हणून या कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणात बघितले जाते.तेथील कार्यालयातील अधिकारी हा उच्चशिक्षित व जबाबदार नियुक्त अधिकारी असतो.आणि अशाच कार्यालयातील जबाबदार अधिकारी जर चुका करून आपल्या बुद्धीचा गैरवापर करून शासनाच्या नियमाची पायमल्ली करत असतील त्यावेळेस त्याला न्यायालयीन दनका बसणे सहाजिकच आहे.आणि तोच प्रकार बीड जिल्ह्यातील या जबाबदार शासन सेवेत कार्यरत असणारे जबाबदार अधिकारी व कर्मचारी व्यक्तींना मा. लोकायुक्त मुंबई व विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांनी दनका दिला आहे.**

**गौण खनिज ही राष्ट्रीय संपत्ती आहे. तीचे रक्षण करणे हे शासन नियुक्त आसणारे जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज उत्खनन सुरू आहे. महाराष्ट्र शासनाचा कोट्यावधी रुपये महसुल बुडविण्यात येत आहे. तसेच पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हाणि होत आहे. परंतु रक्षकच जर भक्षक आसतील तर न्याय मागायचा कोणाकडे हाच प्रश्न अनुत्तरित आहे.**

परंतू शासन सेवेत कार्यरत आसणारे जबाबदार जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांनी पदाचा गैरवापर करून कर्तव्यात कसूर करून माधव काळे यांची गौण खनिज खनिकर्म अधिकारी म्हणून दि.०५/०९/२०२३ रोजी नियुक्त केली .

वास्तविक पहाता माधव काळे नायब तहसीलदार वर्ग २ यांच्याविरुद्ध दि. १७/०६२०१७ रोजी गुरनं ४४०/२०१७ शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच



त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. याबाबत अशोक कातखडे सामाजिक कार्यकर्त यांनी सर्व पुराव्यासह दि. १९/१२/२०२३ रोजी मा. लोकायुक्त मुंबई यांना नोंदणीकृत डाकेने तक्रार दाखल केली आहे. सदरिल तक्रारीची मा. लोकायुक्त मुंबई यांनी गंभीर दाखल घेऊन दि.०७/०३/२०२४ रोजी मा. विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांना एक महिन्यात चौकशी करून अहवाल पाठविण्या बाबत पत्र पाठवले. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दि.०३/०४/२०२४ रोजी पत्र काढून दि. २६/०४/२०२४ पूर्वी ७ दिवस अगोदर दोन प्रतीत अहवाल सादर करावा. आसे कळविण्यात आले .त्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी दि. ०४/२०२४ रोजीचा ईमेल दि. २२/०४/२०२४ रोजी विभागीय आयुक्त यांना आहवाल पाठवला. त्यानंतर विभागीय आयुक्त यांनी दि. २६/०४/२०२४ रोजी उपआयुक्त महसुल विभागीय आयुक्त यांनी मा. लोकायुक्त मुंबई यांना अहवाल सादर केला आहे. तसेच दि. २६/०४/२०२४ रोजी विभागीय उपायुक्त यांनी जिल्हाधिकारी बीड यांना माधव काळे यांच्याविरुद्ध दाखल तक्रारी व गुन्हे दाखल आहेत काय याबाबत २ दिवसात वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा याबाबत पत्रव्यवहार केला. त्यानंतर दि. ०२/०५/२०२४ रोजी पुन्हा स्मरणपत्र १ काढले त्यानंतर शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दि.०३/०५/२०२४ रोजी माधव काळे यांच्याविरुद्ध दोन प्रकरणे दाखल आहेत आसे लेखी उपायुक्त विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांना कळविण्यात आले.

त्यानंतर अशोक कातखडे सामाजिक कार्यकर्ते यांनी दि.०८/०५/२०२४ रोजी माधव काळे यांच्याविरुद्ध दाखल प्रकरणाचे सर्व पुराव्यासह कागदपत्र ईमेल वर व नोंदणीकृत डाकेने मा.लोकायुक्त मुंबई व विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांना पाठविण्यात आले. त्यानंतर दि.१५/०५/२०२४ रोजी मा.विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांनी गंभीर दखल घेऊन जिल्हाधिकारी बीड यांना माधव काळे गौण खनिज खनिकर्म अधिकारी यांना पदावरून तात्काळ कार्यमुक्त करावे आसे आदेश पारित केले आहे.

या प्रकरणात माधव काळे यांची जिल्हा गौण खनिज खनिकर्म अधिकारी पदी बेकायदेशी पणे नियुक्ती करणारे जबाबदार शासन सेवेत कार्यरत आसणारे अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगांची कारवाई करण्यात यावी.अन्यथा श्री.अशोक कातखडे हे मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्याचा हक्क राखीव ठेवत आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

# तरूणांनो बलवान व्हा ,धनवान व्हा व गुणवान व्हा

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

तालुक्यातील दहिवंडी येथे सुरू असलेल्या ४४ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे काल्याचे किर्तनाने झाला यावेळी बोलतांना तरूणाला बलवान व्हा ,धनवान व्हा आणि गुणवान व्हा असा मौलीक उपदेश केला .संत भगवानबाबा ,संत वामनभाऊ महाराज यांचे पदस्पर्शाने पावन झालेल्या दहिवंडीत वै .आबादेव महाराज यांचे अशिर्वादाने व डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे अध्यक्षतेखाली सात दिवसांपासून सप्ताह सुरू होता .शुक्रवारी त्याचा समारोप झाला .सकाळी श्रीक्षेत्र भगवानगडचे महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांनी भेट दिली .



यावेळी बोलतांना विवेकानंद शास्त्री यांनी कृष्ण नितीचे अनुकरण करा ,बलवान होण्यासाठी मैदानी खेळ खेळा ,व्यायाम करा ,शरीर बलवान करा मात्र या बलाचा सदुपयोग करा ,धन कमवा ते श्रमावर अधारीत नितीने मिळवलेल्या धनाचा उपयोग काही अंशी का होईना गरीब गरजूसाठी आणि धर्मासाठी खर्ची घाला आणि महत्वाचे म्हणजे बल आणि धनापेक्षाही तुम्ही गुणवान व्हा असा उपदेश करतांना मुलाबरोबर तरूणींना देखील हाच सल्ला दिला .

व्यसनाच्या आहारी जाऊ नका ,संगत चांगल्याची करा ,तारूण्याच्या नादात भरकटू नका असेही सांगितले .

भगवान कृष्ण बलवान होते धनवान होते आणि गुणवान देखील आणि याचा वापर देखील प्रसंगानुरूप केला असे सांगितले .जन काय म्हणेल याची पर्वा करू नका मनाला साक्षी ठेऊन काम करा जन तुमचे कौतुक केल्याशिवाय राहणार नाही .आष्टी पाटोदा शिरूरचे आ.बाळासाहेब आजबे यांची उपस्थिती होती त्यांनी फंडातून दिलेल्या दहा लाखाच्या सभागृहाचे श्रीफळ फोडून स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे हस्ते उदघाटन केले .यावेळी दहिवंडीसह पंचक्रोशितील भाविक मोठ्या संखेने उपस्थित होते.

श्रीक्षेत्र भगवान गडासाठी देऊ केलेल्या देणगी पोटी शुक्रवारी १९ लाख ६४ हजाराची थैली रोख स्वरूपात ग्रामस्थांनी महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे हस्ते गडाकडे सुपुर्द केली .मागील वर्षी पंचवीस लाखाचा आकडा झाला होता पैकी कांही रोख त्यावेळी डॉ नामदेव शास्त्री यांचेकडे जमा केली व उर्वरीत रक्कम आज जमा करून दहिवंडीकर मुक्त झाले.

# स्नेह-७५ च्यावतीने जागतिक कुटूंब दिनानिमित्त शर्मा परिवाराचा सत्कार

## एकत्रित कुटूंबातून मिळणारी ऊर्जा दीर्घकाळ टिकून राहते - विरेंद्र शिंदे

शेवगांव (प्रशांत बाफना)

पुर्वीची एकत्र कुटूंबपद्धती नष्ट होत असून आज चौकनी कुटूंब पद्धती रुजू होत आहे. त्यामुळे नात्यातील दुरावा निर्माण होत आहे. आज नोकरी, व्यवसाया निमित्त कुटूंबातील सदस्य विभक्त होत आहे. त्यामुळे मानसिक, शारीरिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. एकत्रित कुटूंबामुळे प्रत्येकाचे सुख-दुःख हे वाटून घेतली जात होती. त्यामुळे एकत्रित कुटूंब ही सुखी आणि समृद्ध होती. आजही अनेक परिवारात एकत्रित कुटूंब संस्कृती टिकून आहेत. नोकरी-व्यवसाया निमित्त घरातील सदस्य जरी बाहेर असले तरी सण-उत्सवानिमित्त एकत्र येतात व सर्व कुटूंबाने एकत्रित आलेच पाहिजे, त्यातून मिळणारी ऊर्जा ही दीर्घकाळ टिकून राहते. असे प्रतिपादन विरेंद्र शिंदे यांनी केले.आज जागतिक कुटूंब दिनानिमित्त स्नेह७५चे वतीने शर्मा कुटूंबाचा सन्मान करण्यात आला.यावेळी गुलाब गोरे, प्रमोदकुमार छाजेड, सुवर्णा शिंदे, शर्मा परिवार मधील जेष्ठ हिरालाल शर्मा, गंगाबाई शर्मा,



रमन शर्मा, उमा शर्मा, अनिल शर्मा,योगिता शर्मा, संतोष शर्मा, मनीषा शर्मा, यश शर्मा देविका शर्मा, वेदांत शर्मा, गौतम शर्मा आदी उपस्थित होते.


नगर मधील शर्मा कुटुंब हे ३पिढ्यांपासून पासून एकत्र राहतात. आजच्या काळात ही आनंदाची बाब आहे या परिवाराचा आदर्श घ्यावा असे आवाहन विरेंद्र शिंदे यांनी केले.

प्रास्ताविकात गुलाब गोरे म्हणाले शर्मा परिवार सुशिक्षित असून सर्व सदस्य उद्योग, व्यवसाय, शेती करून पुढील पिढीला प्रेरणा देत एकत्र कुटुंब पद्धती जोपासायला हवी हा संदेश देत आहे. या वेळी हिरालाल शर्मा यांनी सांगितले की आमची ही ३री पिढी आहे माझी मुलं, नातवंडं, त्यांची मुलं असा मोठा परिवार एकत्र असून एक विचार, एकमताने, राहतात यामुळे सर्वांचे सुख दुःख एकमेकांना समजतात. ग्रामीण भागात आता एकत्र कुटुंब पद्धती नष्ट होत आहे याचे वाईट वाटते आमच्या मागे आमचे हे मूल, नातवंडे एकोप्याने राहतील असा विश्वास व्यक्त केला. एकत्र कुटुंब पद्धती ही जीवनाचा आनंद देणारी कुटुंब पद्धती आहे.असे मला वाटते.असे शर्मा यांनी सांगितले. शेवटी प्रमोदकुमार छाजेड यांनी आभार मानले.

# कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनच्या वतीने अनाथालयात साहित्याचे वाटप

**माजलगाव (प्रतिनिधी)**

**येथील कोविड वारिअर रेणुका वाघमारे यांच्या तिस-या पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक क्विंटल ज्वारीचे वाटप आज दि. १६ मे २०२४ रोजी करण्यात आले.**






येथील रेणुका अभिमन्यु वाघमारे या शासकीय रूग्णालयात नर्स म्हणुन कार्यरत होत्या तर कोरोना काळातही त्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले आहे. याकाळातच त्यांना देखिल कोरोनाची लागण झाली आणि यातच त्यांचा मृत्यु झाल्याची दुःखद घटना २०२१ मध्ये घडली. तेंव्हापासुन वाघमारे कुटूंबीयांनी कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनची स्थापना केलेली असुन त्या फाउंडेशनच्या अंतर्गत विवीध समाजोपयोगी उपक्रम राबविलेले आहेत. यामध्ये संविधान दिनानिमीत्त सर्व शासकीय कार्यालयात संविधानाची प्रत वाटप, रक्तदान शिबीर, शासकीय रूग्णालयात फळ वाटप, शासकीय रूग्णांलयातील गोर, गरिब, गरजुवंत रूग्णांना आर्थिक मदत असे विवीध सामाजिक उपक्रम राबवित त्यांच्या स्मृती जपण्याचे काम केले आहे. यावर्षी देखिल स्व. रेणुका वाघमारे यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक क्विंटल ज्वारीचे वाटप करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष अनिकेत वाघमारे, पसायदानचे अनाथालयाचे श्री. दराडे, श्रीमती दराडे व अनाथालयातील चिमुकले व वाघमारे कुटूंबीय उपस्थित होते. दरम्यान मिळालेल्या खाउने चिमुकल्या अनाथ विद्यार्थ्यांच्या चेह-यावर हास्य उमलले होते.

# स्मशानभूमी अभावी अंत्यविधी करण्याच्या कारणावरून वाद लाजीरवाणी बाब

## लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला सोयरसुतक नाही:- डॉ.गणेश ढवळे

**बीड (प्रतिनिधी)**

**आयुष्यभर संघर्ष केल्यानंतर निदान मृत्यु तरी सुखासुखी व्हावा अशी सर्वसामान्य माणसांची ईच्छा असते मात्र मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना त्यांच्या अंत्यविधीसाठी संघर्ष करावा लागतो.वेगवेगळ्या समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी आहेत.तर काही ठिकाणी स्मशानभूमीची दुरावस्था झालेली आहे.काही ठिकाणी काटेरी झुडुपातुन वाट काढत दहनशेडकडे जावे लागते. ग्रामीण भागातील स्मशानभूमीची अवस्था मरणासन्न असुन जागेअभावी काहींना शेतात, उघड्यावर किंवा नदीकाठी अंत्यसंस्कार करावे लागत आहेत.**

**बीड तालुक्यातील पालवण येथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याच्या कारणावरून वाद झाला.मागासवर्गीय समाजाच्या स्मशानभूमीचे बांधकाम झालेले नसल्याने सार्वजनिक स्मशानभूमीमध्ये वादविवाद होऊन अखेर गुन्हा दाखल झाला आहे. यानिमित्ताने स्मशानभूमीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**

### तहसिल व ग्रामपंचायत कार्यालयासमोर मृतदेह ठेवल्याच्या घटना

केज तालुक्यातील सोनेसांगवी (सुर्डी) गावातील दि.४जाने २०२२ लक्ष्मी शहाजी कसबे वय ६५ ,दि.११ एप्रिल २०२२ रोजी नंदुबाई नामदेव थोरात वय ५० वर्षे,दि.२६ एप्रिल २०२२ रोजी अंबुबाई काशीनाथ साखरे वय ७५ वर्षे यांचे ४ महिन्यात ३ वेळा मागासवर्गीय महिलांचे अंत्यसंस्कार रोखण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यावेळी नातेवाईकांनी मृतदेह केज तहसिल कार्यालयात आणुन ठेवला होता. गेवराई तालुक्यातील सुशी



(वडगाव) गावात दि.२१ डिसेंबर २०२३ रोजी तुळशीराम कलेढोण वय ५४ वर्षे यांचा मृतदेह गावातील लोकांनी सरकारी ओढ्यात अंत्यसंस्कार करण्यास विरोध केल्याने ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठेवण्यात आला होता.

बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत असुन अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन अंत्यसंस्कार दरम्यान काही गावांमध्ये वादविवाद होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडत असल्याने तातडीने उपाययोजना करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पिंडदान आंदोलन सरण रचुन सरणावरती ठिय्या आंदोलन मृतदेह शासन दारी आदि लक्ष्यवेधी आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला मात्र लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन यांना स्मशानभूमी अभावी मृतदेहाची हेळसांड आणि गावात वादविवाद होत असताना सोयरसुतक नसल्याचे दिसून येत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT